# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.11.2025** **वारःगुरुवार**

---

1. सेंद्रीय शेतीवर भर देण्याचं पंतप्रधानांचं आवाहन, किसान सन्मान निधीच्या हप्त्याचं वितरण
2. नितीश कुमार आज घेणार बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ
3. 56वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव-इफ्फी आजपासून गोव्यात आणि
4. मुकबधिरांच्या ऑलिंपिक स्पर्धेत नेमबाजीत अभिनव देश्वाल आणि प्रांजली धुमाळ या जोडीला सुवर्णपदक

**पंतप्रधान**

विकसित भारतासाठी भविष्यातील कृषी प्रणाली तयार करण्याकरिता एकत्रित प्रयत्न करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल कोईमतूर इथं केलं. दक्षिण भारत नैसर्गिक कृषी शिखर परिषदेचं उद्घाटन करताना पंतप्रधान बोलत होते. पंतप्रधानांनी शेतकऱ्यांना एका हंगामात एक एकर भूभागावर सेंद्रिय शेती करण्याचं आणि त्याचे अद्भुत परिणाम पाहण्याचं आवाहन केलं. शेतीचं आधुनिकीकरण करण्यासाठी सरकार सकारात्मक पावलं उचलत आहे, किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दहा लाख कोटी रुपयांची मदत सरकारने दिल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या अकरा वर्षात देशातल्या कृषी क्षेत्रात परिवर्तन झालं असून भारत नैसर्गिक शेतीसाठी जागतिक केंद्र बनत आहे, असंही पंतप्रधान म्हणाले. यावेळी किसान सन्मान योजनेचा 21 वा हप्ता पंतप्रधानांच्या हस्ते वितरित करण्यात आला. देशभरातल्या नऊ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 18 हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा करण्यात आली. महाराष्ट्रातल्या 90 हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात किसान सन्मान निधीच्या 21 व्या हप्त्याचे एक हजार 808 कोटी 25 लाख रुपये जमा झाले आहेत.

**पंतप्रधान दक्षिण आफ्रिका दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी 21 ते 23 नोव्हेंबर दरम्यान दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग इथं होणाऱ्या 20 व्या जी-20 नेत्यांच्या शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. ग्लोबल साउथमध्ये होणारी ही सलग चौथी जी-20 शिखर परिषद आहे. या परिषदेत पंतप्रधान जी-20 अजेंड्यावर भारताचे दृष्टिकोन मांडतील, असं परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. पंतप्रधान शिखर परिषदेच्या तिन्ही सत्रांमध्ये भाषण देण्याची अपेक्षा आहे. या शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान मोदी जोहान्सबर्गमध्ये उपस्थित असलेल्या काही नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेण्याची अपेक्षा आहे. ते दक्षिण आफ्रिकेने आयोजित केलेल्या भारत-ब्राझील-दक्षिण आफ्रिका नेत्यांच्या बैठकीतही सहभागी होतील, असंही परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**बिहार**

संयुक्त जनता दलाचे प्रमुख नितीश कुमार आज 10 व्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. पाटणा इथं आज सकाळी 11.30 वाजता, ऐतिहासिक गांधी मैदानावर शपथविधी सोहळा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अनेक मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. पाटणा इथं काल झालेल्या युतीतील नवनिर्वाचित आमदारांच्या संयुक्त बैठकीत प्रमुख नितीश कुमार यांची रालोआच्या विधिमंडळ पक्षनेते म्हणून निवड करण्यात आली. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत रालोआनं

202 जागा जिंकून विजय मिळवत, सत्ता हस्तगत केली आहे. तत्पूर्वी, भाजप नेते सम्राट चौधरी यांची भाजप पक्ष विधिमंडळ नेते म्हणून, तर विजय सिन्हा यांची उपनेते म्हणून निवड करण्यात आली.

**राष्ट्रपती- सर्वोच्च न्यायालय**

संविधानाच्या कलम 143 अंतर्गत राष्ट्रपतींनी दिलेल्या संदर्भावर सर्वोच्च न्यायालय आज आपलं मत मांडणार आहे. राज्य विधिमंडळांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर कारवाई करण्यासाठी राज्यपालांना कालमर्यादा लागू करता येईल का, यावर सर्वोच्च न्यायालयाचे मत मागण्यात आलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती बी.आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठानं 11 सप्टेंबर रोजी केंद्राकडून ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी आणि सॉलिसिटर जनरल तुषार मेहता तसंच राष्ट्रपतींच्या संदर्भाला विरोध करणाऱ्या तमिळनाडू, पश्चिम बंगाल, केरळ, कर्नाटक, तेलंगण, पंजाब आणि हिमाचल प्रदेश या राज्यांकडून करण्यात आलेल्या 10 दिवसांच्या तोंडी युक्तिवादानंतर आपला निर्णय राखून ठेवला होता.

**अमित शहा**

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ अर्थात एनसीडीसी हे सहकारी संस्थांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांना आर्थिक मदत देण्यासाठी एक उत्तम माध्यम ठरलं आहे, असं मत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी काल नवी दिल्ली इथं संस्थेच्या 92 व्या सर्वसाधारण परिषदेत व्यक्त केलं. साखर कारखाने आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रात थेट शेतकऱ्यांना फायदा देणाऱ्या वर्तुळाकार अर्थव्यवस्थेला चालना देण्याची गरज असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. देशातील पहिली सहकारी टॅक्सी सेवा सुरू करण्यात एनसीडीसीची महत्त्वपूर्ण भूमिका नमूद केली. गेल्या काही वर्षांत एनसीडीसीकडून सहकारी संस्थांना मिळणारी आर्थिक मदत जवळजवळ चार पटीने वाढून 95 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**इंदिरा गांधी**

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त काल देशभरात त्यांना अभिवादन करण्यात आलं. इंदिरा गांधी यांची जयंती राष्ट्रीय एकात्मता दिन म्हणून साजरी करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावर त्यांना श्रद्धांजली वाहिली. मुंबईत राजभवनातही इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

**इफ्फी**

56 वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव इफ्फी आजपासून गोव्यात सुरू होत आहे. द ब्लू ट्रेल या चित्रपटाने या महोत्सवाची सुरुवात होणार आहे. येत्या 28 तारखेपर्यंत हा महोत्सव चालेल. या महोत्सवा दरम्यान 13 विश्व प्रीमियर आणि आणि 46 एशिया प्रीमियर होतील. सर्वश्रेष्ठ चित्रपटासाठी सुवर्ण मयुर पुरस्कारासह ४० लाख रुपयांची रोख बक्षीसं दिली जातील. यावर्षी जपान केंद्रस्थानी आहे तर स्पेन भागीदार राष्ट्र म्हणून सहभागी होत आहे. तर ऑस्ट्रेलिया स्पॉट लाईट देश म्हणून आमंत्रित आहे. यावेळी प्रथमच एआय फिल्म हॅकेथॉन आयोजित केली जात आहे. चित्रपट निर्मितीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवकल्पनांचा शोध आणि चित्रपटाचा प्रभाव वाढविण्यासाठी एआयचा एक साधन म्हणून वापर करण्यासाठी 48 तासांची स्पर्धा आयोजित केली जात आहे. तसंच यंदा युनिसेफ बरोबर भागीदारी करण्यात आली असून, मुलांच्या भावविश्वावर आधारित पाच विशेष चित्रपट यावेळी दाखविण्यात येणार आहेत. नऊ दिवस चालणाऱ्या या महोत्सवात 80 पेक्षा जास्त देशातील पाहुणे, चित्रपट निर्माते, आणि 270 हून जास्त चित्रपटांचा सहभाग आहे.

**भारतीय कलामहोत्सव**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्या संध्याकाळी हैदराबादमधील राष्ट्रपती निलायम इथं आयोजित दुसऱ्या भारतीय कलामहोत्सवाच्या औपचारिक उद्घाटन होणार आहे. संस्कृती, पर्यटन आणि वस्त्रोद्योग मंत्रालयांच्या सहकार्यानं राष्ट्रपती भवनातर्फे आयोजित साहित्य, सामाजिक, सांस्कृतिक, हस्तकला यांचा संगम असलेल्या या दहा दिवसांच्या महोत्सवात गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, गोवा आदी राज्यांचा सहभाग आहे. यावर्षी सुमारे दीड लाख लोक या महोत्सवाला भेट देण्याचा अंदाज आहे. नागरिकांना

शनिवारपासून 30 तारखेपर्यंत या महोत्सवाला भेट देता येईल. यावेळी पारंपरिक हातमाग, हस्तकला आणि प्रादेशिक उत्पादनं खरेदी करण्यासह प्रादेशिक खाद्यसंस्कृतीचाही आस्वाद घेता येईल, असं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**युएई व्हिसा**

भारताने संयुक्त अरब अमिराती अर्थात युएईच्या नागरिकांसाठी कोचीन, कालिकत आणि अहमदाबाद आंतरराष्ट्रीय विमानतळांवर व्हिसा-ऑन-अरायव्हल सुविधा उपलब्ध केली आहे. यामुळं आता युएईच्या नागरिकांना आता भारतातील नऊ प्रमुख विमानतळांवर ही सुविधा उपलब्ध झाली आहे. पूर्वी ही सुविधा नवी दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळुरू, हैदराबाद आणि कोची इथं उपलब्ध होती. युएईच्या ज्या नागरिकांनी पूर्वी भारतीय ई-व्हिसा किंवा नियमित कागदी व्हिसा मिळवला आहे, त्यांच्यासाठीच ही योजना असून, या योजनेअंतर्गत ते 60 दिवसांपर्यंत भारतात राहू शकतात. या व्हिसासाठी अर्जदारांकडे किमान सहा महिन्यांची वैधता असलेला पासपोर्ट असणे आवश्यक आहे. पर्यटन, व्यवसाय किंवा वैद्यकीय कारणांसाठी भारतात येणाऱ्या युएईच्या नागरिकांचे प्रमाण वाढत आहे, त्यांना सहजपणे भारतात येणं शक्य व्हावं, दोन्ही देशांमधले संबंध दृढ व्हावेत, या उद्देशानं ही सुविधा देण्यात आली आहे.

**मूकबधिर-ऑलिंपिक**

जपानमध्ये टोकिओ इथं सुरू असलेल्या मूकबधीरांच्या 25 व्या ऑलिंपिक स्पर्धेत अभिनव देश्वाल आणि प्रांजली धुमाळ या भारतीय नेमबाज जोडीनं 10 मीटर एअर पिस्तुल स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं. अंतिम लढतीत त्यांनी चिनी तैपाईच्या जोडीला 16-6 असं पराभूत केलं. तर, कुशाग्र सिंग राजावतनं 50 मीटर रायफल प्रोन स्पर्धेत कास्य पदक पटकावलं. या स्पर्धेत नेमबाजीत भारतानं आतापर्यंत एकूण 11 पदकांची कमाई केली आहे.

**ऑस्ट्रेलिया टेनिस**

ऑस्ट्रेलियन खुल्या सुपर 500 बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्य सेन आणि एचएस प्रणॉय यांनी पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. सिडनी इथं काल झालेल्या सामन्यात लक्ष्य सेननं चिनी तैपेईच्या सु ली-यांगचा पराभव केला, तर एचएस प्रणॉयनं इंडोनेशियाच्या मार्सेलीनोचा पराभव केला.

**क्रिकेट**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं एकोणीस वर्षांखालील मुलांच्या विश्वचषक क्रिकेट सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. ही स्पर्धा पुढील वर्षी 15 जानेवारी ते 6 फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. झिम्बाब्वे आणि नामिबिया यांनी संयुक्तरित्या याचे आयोजन केलं आहे. चार गटांमध्ये 16 संघ या स्पर्धेत सहभागी असून एकूण 41 सामने होणार आहेत. सहा फेब्रुवारी रोजी हरारे स्पोर्ट्स क्लब इथं अंतिम सामना होईल. या स्पर्धेत सलामीचा सामना भारत आणि अमेरिका यांच्यात होणार असून, झिम्बाब्वेचा सामना स्कॉटलंडशी आणि टांझानियाचा सामना वेस्ट इंडिजविरुद्ध होईल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.